दैनिक दिव्य मराठी

09-Jun-2019
उस्मानाबाद जिल्हा Page 4

**आश्वासन** • महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन, कळंब येथे बियाणे वाटप

# महिला, शेतकऱ्यांना सक्षम करण्याचा सरकारचा प्रयत्न, शेतीमालासही भाव

प्रतिनिधी | कळंब

शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला भाव देऊन महिलांना सक्षम करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे, दुष्काळी परिस्थितीमुळे ज्या मुलींचे शिक्षण बंद पडण्याच्या मार्गावर आहे. त्या मुलींचे शिक्षण पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न सरकार करणार आहे, असे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

एकल महिला शेतकरी (आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पत्नी) सक्षमीकरणासाठी पुण्यातील फिनोलेक्स पाइप्स आणि त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशन व फिक्की फ्लो पुणे चॅप्टर यांच्या पुढाकाराने पुण्यातील साई मित्र परिवार, कळंब येथील पर्याय सामाजिक संस्था व कृषी विज्ञान केंद्र तुळजापूर यांच्या सौजन्याने ४१२ महिला शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन आणि तुरीचे बियाणे महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. कळंब आणि वाशी तालुक्यातील जवळपास ४० गावातील ४१२ महिला शेतकऱ्यांना प्रत्येकी ३० किलो सोयाबीन, एक किलो तूर डाळीचे बियाणे देण्यात आले. या प्रसंगी मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया, आमदार सुजितसिंह ठाकूर, फिनोलेक्स पाइपचे उपाध्यक्ष बी. आर. मेहता, फिक्की फ्लो पुणे चॅप्टरच्या सदस्या अनिता सणस, रेखा मगर, अप्पर जिल्हाधिकारी पराग सोमण, पर्याय संस्थेचे विश्वनाथ तोडकर, मुकुल माधव फाउंडेशनचे बबलू मोकळे, सचिन कुलकर्णी, मंगेश तळेकर, अमोल ठाकरे आदी उपस्थित होते.

यावेळी महसूल मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, आपण ग्रामीण भागातील लोक स्वाभिमानी असतो. आपल्याला देणगी, अनुदान चालत नाही पण नैसर्गिक आपत्तीमुळे ही परिस्थिती आली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी जलसंधारणाची कामे करून पावसाचा प्रत्येक थेंब वाचवण्याचा मानस आहे. शेततळी उभारली जात आहेत. त्यामुळे यंदा पीक चांगले येईल, त्याला चांगला भाव देण्यासाठी प्रयत्न आहे. शेतकऱ्यांनी शेतीला आधुनिकतेची जोड दिली पाहिजे. त्यासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या सहकार्याने वेगळे प्रयोग करावेत. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी फिनोलेक्स पाइप व मुकुल माधव फाउंडेशन मदत करत आहेत. याचा आधार शेतकऱ्यांना झाला आहे. दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपली जिवनयात्रा संपवली आहे. त्यानंतर कुटुंबाची जिम्मेदारी महिलांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे महिलांनी शक्तीचा व बुध्दीचा वापर करून प्रगती केले पाहिजे. तेव्हाच कुटुंब सुखी ठेवता येईल. महिला काम करून घर चालविण्यासाठी घरात पैसे देत असतील तर त्यांची किंमत निश्चित वाढते, त्यामुळे आगामी काळात महिलांना सक्षम करण्यासाठी सरकारचा प्रयत्न असणार आहे, असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे. अनिता सणस यांनी फिक्की फ्लोच्या उपक्रमांविषयी सांगितले. महिलांना साडीचोळी आणि भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी बबलू मोकळे यांनी सूत्रसंचालन, स्वागत प्रास्ताविक केले.




कळंब येथे चंद्रकात पाटील यांच्या हस्ते महिला शेतकऱ्यांना बियाणे वितरण करण्यात आले.

## यांना केले बियाणाचे वाटप

अनिता कानाडे, विद्या मोरे, आशा बोराडे, इंदुबाई आडसुळ, आशा गवारे, उषा ढेपे या महिलांना प्रातिनिधिक स्वरूपात बियाणे वाटप करण्यात आले आहे.

## पेरणीची चिंता मिटली

*दुष्काळामुळे कंबरडे मोडले आहे. पैशाअभावी पेरणीची आशा सोडली होती. सोयाबीन व तुरीचे बियाणे मोफत मिळाले आहे. त्यामुळे पेरणीची चिंता मिटली आहे.*

**-धोंडाबाई निंगुळे,** शेतकरी महिला.